कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील
सहाय्यक निरिक्षक (गट-ब) राजपत्रित या
संवर्गातील सन २०१९ मधील बदल्यांबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन आदेश क्रमांक: बदली २०१९/प्र.क्र.६०/(भाग-२) /तांशि-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३० मे, २०१९.

शासन आदेश-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ कलम ४(४) मध्ये विहित केलेल्या तरतुदींनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांच्या मंजूरीने कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सहाय्यक निरिक्षक (गट-ब) या संवर्गातील सर्वसाधारण बदल्या खालीलप्रमाणे करण्यात येत आहेत.

सहाय्यक निरिक्षक -गट-ब (राजपत्रित)

अ. क्र.	नांव व पदनाम	सध्या कार्यरत कार्यालयाचे नाव व ठिकाण	प्रस्तावित बदलीच्या कार्यालयाचे नाव व ठिकाण	बदलीचा प्रकार प्रशासकीय/ विनंती	समितीची शिफारस
१.	श्री. भा. ना.तिखे सहाय्यक निरिक्षक	कला संचालनालय, मुंबई.	निरिक्षक, चित्रकला व शिल्प कार्यालय, मुंबई	प्रशासकीय	शिफारस आहे

०२. प्रशासकीय कारणास्तव बदली झालेल्या सहाय्यक निरिक्षकांना शासन नियमानुसार पदग्रहण अवधी, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

०३. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्याच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ मधील तरतुदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याच्या मंजूरीने सदर बदल्या करण्यात येत आहेत.

०४. बदलीच्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरिता खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(१) हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

(२) बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित सहाय्यक निरिक्षक यांनी सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयातून त्यांची बदलीनंतरची पदस्थापना केलेल्या कार्यालयात तात्काळ रुजू व्हावे. तसेच संबंधित कार्यालय प्रमुखांनी पर्यायी सहाय्यक निरिक्षक हजर होण्याची वाट न पाहता बदली झालेल्या सहाय्यक निरिक्षक यांना तात्काळ कार्यमुक्त करावे.

(३) बदली झालेले सहाय्यक निरिक्षक संबंधीत कार्यालयातून कार्यमुक्त होऊन रुजू होण्यासाठी आल्यानंतर विनाविलंब रुजू करुन घ्यावे. त्यांना रुजू करुन न घेतल्यामुळे

सक्तीचा प्रतिक्षाकाळ ठरुन काम न करता वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्भवल्यास संबंधित कार्यालय प्रमुखांना जबाबदार धरण्यात येईल.

(४) पदस्थापनेत बदल करण्यासंबंधीच्या कोणत्याही विनंतीची दखल घेण्यात येणार नाही. सदर बदली आदेशात बदल करुन घेण्यासाठी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित सहाय्यक निरिक्षक शिस्तभंग विषयक कारवाई करण्यास पात्र ठरतील.

(५) बदली झालेले सहाय्यक निरिक्षक बदलीच्या ठिकाणी रूजू होईपर्यत त्यांची कोणतीही रजा प्रशासकीय विभागाच्या पूर्वमान्यतेशिवाय मंजूर करण्यात येऊ नये.

(६) सदर बदल्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे गरजेचे असल्याने तसेच सदर आदेश तात्काळ अमंलात येत असल्याने बदली झालेल्या सहाय्यक निरिक्षकांचे कार्यमुक्ततेच्या दिनांकापर्यंतचे अथवा जास्तीत जास्त **दि. ३१ मे २०१९** पर्यंतचे वेतन ते सध्या कार्यरत असलेल्या आस्थापनेवर काढावेत. त्यानंतरचे वेतन कोणत्याही परिस्थितीत बदलीपूर्वीच्या आस्थापनेकडून काढण्यात येऊ नये. सदर वेतन संबंधित सहाय्यक निरिक्षकांच्या बदलीच्या संस्थेत रूजू झाल्यानंतर बदलीनंतरच्या आस्थापनेने काढावे. दि.१ जुन, २०१९पासूनचे वेतन बदलीपूर्वी कार्यरत असलेल्या आस्थापनेतील आहरण व संवितरण अधिकाऱ्याने अदा केल्यास त्यांना व्यक्तीश: जबाबदार धरण्यात येईल.

(७) बदली झालेल्या सहाय्यक निरिक्षकांना तात्काळ कार्यमुक्त करण्याची जबाबदारी वैयक्तीरित्या संबधित कार्यालय प्रमुखांची राहील. याबाबतचा पाठपुरावा संचालक, कला संचालनालय, यांनी करावा. तसेच, याबाबत कार्यपालन अहवाल या आदेशांच्या दिनांकापासून १५ दिवसांत शासनास सादर करावा.

०५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०५३०१९४०५१०५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sandesh Rajaram Utekar

Digitally signed by Sandesh Rajaram Utekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=009789e9fe23fde06096381e43bebecd32b5c692c899745eee7d89d805005a87, cn=Sandesh Rajaram Utekar
Date: 2019.05.30 19:47:22 +05'30'

(सं.रा. उतेकर)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. प्र.संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. निरिक्षक, चित्रकला व शिल्प कार्यालय, मुंबई
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) नागपूर.
४. श्री. भा.ना.तिखे,सहाय्यक निरिक्षक, कला संचालनालय, मुंबई
५. निवड नस्ती, तांशि-६.